जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५३१ दिनांक - ११/०७/२०२३**

**सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर**

## दोन जुगार अड्डयावर छापा टाकुन २७ इसमावर कारवाई करून रोख २७,९३०/- रू.व १,२१,०००/- रू.कि. चे मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकुण १,४८,९३० रू.कि.चा मुद्देमाल जप्त.

दि.१०.०७.२०२३ रोजी गोसावी वस्ती,हडपसर व सातवनगर, वानवडी पुणे परीसरात काही इसम बेकायदेशीरपणे मटका जुगार खेळत व खेळवत असलेबाबत प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीदार मार्फतीने खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी गोपनियरित्या पाळत ठेवुन छापा टाकला असता काही इसम बेकायदेशीरपणे मटका जुगार पैसे लावुन खेळत व खेळवत असल्याचे मिळुन आल्याने २७ इसमावर कारवाई करून रोख २७,९३०/-रू.व १,२१,०००/-रू.कि. चे मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकुण १,४८,९३० रू.कि.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी जुगार खेळताना मिळुन आलेले इसम व दोन पाहिजे आरोपी अशा २७ इसमांविरूध्द हडपसर व वानवडी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व त्यांना पुढील कारवाई करीता हडपसर व वानवडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री.अमोल झेंडे, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.भरत जाधव तसेच सपोनि अश्विनी पाटील,सपोनि अनिकेत पोटे,पोलीस अंमलदार बाबा कर्पे, अजय राणे,तुषार भिवरकर,इरफान पठाण,हणमंत कांबळे,इम्रान नदाफ,संदीप कोळगे,अमित जमदाडे,किशोर भुजबळ या पथकाने यशस्वी केली आहे.